# वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ डिसेंबर २०२२.

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेनिवे-२०२२/प्र.क्र.१५/सेवा-४.– भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ ला आणखी सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन)(तिसरी सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ (यात यापुढे ज्याचा उल्लेख "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम ६० मधील उपनियम (१) ऐवजी पुढील उपनियम दिनांक १ जानेवारी २००६ पासून अंतर्भूत करण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

"(१) '**निवृत्तिवेतनार्ह वेतन**' म्हणजे, शासकीय कर्मचाऱ्याने, शेवटच्या दहा महिन्यांच्या सेवेमध्ये अर्जित केलेले सरासरी वेतन किंवा ज्या पदावरून शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे, त्या पदाकरिता निश्चित केलेले मूळ वेतन, यापैकी जे शासकीय कर्मचाऱ्यास अधिक फायदेशीर असेल ते वेतन."

३. मुख्य नियमाच्या नियम ११० मधील उपनियम (२) मध्ये,—

(अ) खंड (ए) मध्ये "रुपये ६७,००० अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतन" या मजकुराऐवजी "रुपये दोन लाख वीस हजार" हा मजकूर दिनांक १ जानेवारी २०१६ पासून अंतर्भूत करण्यात आल्याचे मानण्यात येईल;

(ब) खंड (बी) मध्ये,—

(१) "रुपये ६७,००० अधिक अनुज्ञेय ग्रेड वेतन" या मजकुराऐवजी "रुपये दोन लाख वीस हजार" हा मजकूर दिनांक १ जानेवारी २०१६ पासून अंतर्भूत करण्यात आल्याचे मानण्यात येईल;

(२) "एक हजार नऊशे तेरा रुपयांहून" या मजकुराऐवजी "सात हजार पाचशे रुपयांहून" हा मजकूर दिनांक १ जानेवारी २०१६ पासून दाखल करण्यात येत आहे.

४. मुख्य नियमाच्या नियम १११ मध्ये,—

(अ) उपनियम (२) मध्ये असलेल्या तक्त्याऐवजी पुढील तक्ता दिनांक १ जानेवारी २०१६ पासून दाखल करण्यात येत आहे :–

**"तक्ता**

| अ.क्र.<br>(१) | अर्हताकारी सेवेचा कालावधी<br>(२) | मृत्यू उपदानाचा दर<br>(३) |
|---|---|---|
| १ | सेवा एक वर्षापर्यंत | अंतिम वेतनाच्या दुप्पट |
| २ | सेवा एक वर्षापेक्षा जास्त व पाच वर्षांपर्यंत | अंतिम वेतनाच्या सहा पट |
| ३ | सेवा पाच वर्षांपेक्षा जास्त व अकरा वर्षांपर्यंत | अंतिम वेतनाच्या बारा पट |
| ४ | सेवा अकरा वर्षांपेक्षा जास्त व वीस वर्षांपर्यंत | अंतिम वेतनाच्या वीस पट |
| ५ | सेवा वीस वर्षांपेक्षा जास्त | अर्हताकारी सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक सहामाही कालावधीसाठी अंतिम वेतनाच्या निम्मे मात्र अंतिम वेतनाच्या तेहतीस पटीच्या मर्यादेत.". |

(ब) उपनियम (२) मधील परंतुकातील "सात लाख रुपयांहून" या मजकुराऐवजी "चौदा लाख रुपयांहून" हा मजकूर दिनांक १ जानेवारी २०१६ पासून दाखल करण्यात येत आहे.

५. मुख्य नियमाच्या नियम १६२ मधील खंड (ए) मधील उपखंड (दोन) मधील परिच्छेद (ए) मध्ये "रुपये ५००" ऐवजी "रुपये पंधरा हजार" हा मजकूर दिनांक १ जानेवारी २०१६ पासून दाखल करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**र. शि. घाटगे,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 1st December 2022.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No.PEN-2022/CR.15/SER-4.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Pension) (Third Amendment) Rules, 2022.

2. In Rule 60 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 (hereinafter referred to as the "the principal Rules"), for sub-rule (1), the following shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2006, namely :—

"(1) 'Pensionable Pay' means the average pay earned by a Government servant during the last ten months' service or the basic pay fixed for the post from which a Government servant has been retired, whichever is more beneficial to the Government Servant."

3. In rule 110 of the principal Rules, in sub-rule (2),—

(*i*) in clause *(a)*, for the letters, figures and words "Rs. 67,000 plus admissible grade pay" the words "rupees two lakhs twenty thousand" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2016 ;

(*ii*) in clause *(b)*,—

(*a*) for the letters, figures and words "Rs.67,000 plus admissible grade pay" the words "rupees two lakhs twenty thousand" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2016 ;

(*b*) for the words "Rupees One Thousand Nine Hundred and Thirteen" the words "rupees seven thousand five hundred" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2016.

4. In rule 111 of the principal Rules,—

(*i*) in sub-rule (2), for the existing Table, the following Table shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2016, namely :—

"TABLE

| Serial No. (1) | Length of qualifying Service (2) | Rate of death gratuity (3) |
|---|---|---|
| i | Less than one year | two times of the last pay |
| ii | One year or more but less than five years | six times of the last pay |
| iii | Five years or more but less than eleven years | twelve times of the last pay |
| iv | Eleven years or more but less than twenty years | twenty times of the last pay |
| v | Twenty years or more | Half of the last pay for every completed six monthly periods of qualifying service subject to a maximum of thirty-three times of the last pay.". |

(*ii*) in the first proviso, for the words "Seven Lakh Rupees" the words "Fourteen Lakh Rupees" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2016.

5. In rule 162 of the principal Rules, in clause (a), in sub-clause *(ii)*, in paragraph (A), for the letters and figures "Rs. 500", the words "rupees fifteen thousand" shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 1st January 2016.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. S. GHATGE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.